# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

'विद्याविहार', पो. लोणेरे- ४०२ १०३, ता. माणगाव

जिल्हा- रायगड. (महाराष्ट्र राज्य) भारत.

registrar@dbatu.ac.in दुरध्वनी क्रमांक : 02140-275142/275212


---

क्रमांक : डॉ.बाआंतंवि/शै. वि./स्कॉलरशिप/२०२०-२१/96

दिनांक : ०७/०९/२०२१

**शैक्षणिक विभाग**

## नोटीस

शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये महा डिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती करीता ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केलेले आहेत. परंतु अर्जामध्ये त्रुटी असल्याकारणाने अर्ज परत (Sent back) पाठविण्यात आलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी आपल्या शिष्यवृत्ती अर्जामध्ये असलेल्या त्रुटीची (Scrutiny remark) पाहणी करुन सदरचा अर्ज पुन्हा (reapply) सादर करण्यासाठी महा डिबीटी पोर्टलकडुन वाढीव मुदत दिलेली आहे. **शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मधील अर्जाकरीता दि. १५/०९/२०२१ तर शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ मधील विद्यार्थ्यांकरीता दि.३०/०९/२०२१ पर्यंत चुकीचे अर्ज दुरुस्त करुन ऑनलाईन पध्दतीने सादर करता येणार आहेत.**

विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, वारंवार शिष्यवृत्ती अर्जांध्ये एकाच प्रकारची चुकी केली जात आहे. त्यामुळे अर्ज प्रत्येक वेळेला परत पाठविण्यात येत आहे. अशा वेळी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाशी प्रत्यक्ष संपर्क करुन अर्जाची दुरुस्ती करुन घ्यावी जेणेकरुन अर्जामध्ये पुन्हा चुका होणार नाही. **जे विद्यार्थी वारंवार सुचना देऊन सुध्दा चुकीचा अर्ज सादर करतील अशा विद्यार्थ्यांचा अर्ज नामंजुर झाल्यास किंवा शिष्यवृत्ती न मिळाल्यास याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची असेल व सदर विद्यार्थ्याला विद्यापीठाची त्या वर्षाची संपुर्ण प्रवेश फी भरावी लागेल.**

**सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्जांध्ये दिलेल्या मुदतीच्या दोन दिवस अगोदर अर्ज सादर करावे जेणेकरुन सदरचे अर्ज विद्यापीठ स्तरावर तपासणे शक्य होईल. जे विद्यार्थी मुदतीच्या शेवटच्या दिवशी अर्ज सादर करतील त्यांचा अर्ज तपासणी करणे शक्य न झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

08/9/2021

Office Superintendent

Dr. Babasaheb Ambedkar Technological University

Lonere - 402 103, Tal. Mangaon, Dist. Raigad

प्रति,

१. सर्व विद्यार्थी

२. नोटीस बोर्ड (सुचना फलक)

३. वेबसाईटवर माहितीकरीता.

प्रत:- मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणरे - रायगड यांना माहितीसाठी सादर.

Attention!!!

- Application Acceptance (New/Renewal) for A.Y.20-21 has been Extended to 30th Sept 2021.
- Last date for Application Re-Apply of A.Y. 19-20 is 15th Sept 2021.
- Guidelines and Rules of procedure for application submission. Please read carefully.